वनस्पतिशास्त्र विभाग 2025-2026(Annual Report)

वनस्पतिशास्त्र विभागाने शैक्षणिक वर्ष 2025–2026 दरम्यान अध्यापन, संशोधन, पर्यावरण संवर्धन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले. विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी शैक्षणिक तसेच सहशैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. तसेच विभागातील Ms. संजना बर्वे यांनी SET परीक्षा उत्तीर्ण केली.विभागाकडून UGC मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये एक research paper प्रकाशित झाला. तसेच "Science for Sustainability: An Interdisciplinary Approach (SUSIA-2026)" या National Conference दोन Abstracts प्रकाशित झाले.

विभागातील प्राध्यापकांनी एकूण 5 पुस्तकांमध्ये 12 चॅप्टर प्रकाशित केली.

Botany विभागातील डॉ. शिल्पा शितोळे यांची महाविद्यालयाच्या CDC सदस्य म्हणून महिला प्राध्यापकांमधून निवड झाली.

शैक्षणिक व संशोधन सहकार्यासाठी Amrut Food Agro Private Ltd. या संस्थेसोबत ४ मार्च २०२६ रोजी (MoU) करण्यात आला.

महाविद्यालय परिसरातील जैवविविधता वाढवण्यासाठी विविध फळझाडांची लागवड करण्यात आली. त्यामध्ये फणस (४०), चिंच (४०), जांभूळ (८०) आणि कवठ (४०) अशा झाडांचा समावेश आहे.

महाविद्यालय परिसरात जैवविविधता वाढवण्यासाठी मियावाकी पद्धतीने उद्यान दोन टप्प्यांमध्ये विकसित करण्यात आले असून सुमारे १६ एकर क्षेत्र विकसित करण्यात आले आहे.

वनस्पतिशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी १० जानेवारी २०२६ रोजी KVK, नारायणगाव येथे आयोजित Global Agriculture Festival 2026 ला शैक्षणिक भेट देऊन आधुनिक शेती व तंत्रज्ञानाविषयी माहिती घेतली.

२८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा, पोस्टर सादरीकरण आणि प्रयोगशाळा प्रदर्शन असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.

अशा प्रकारे वनस्पतिशास्त्र विभागाने शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये अध्यापन, संशोधन व पर्यावरण संवर्धन या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले.